प्रेसनोट　　　　　　　　　　　　　　　　　　दिनांक –२६/१०/२०२३

**अतिरिक्त सत्र न्यायालय, पालघर यथील अतिरिक्त सरकारी अभियोक्ता यांना लाच स्विकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर यांनी ताब्यात घेतले**

| | | |
|---|---|---|
| १ | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/ घटक | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर |
| २ | पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्रमांक | पालघर पोलीस ठाणे |
| ३ | कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा सन १९८८ (सुधारणा २०१८) चे कलम ७ प्रमाणे |
| ४ | लोकसेवकाचे नाव व कार्यालय | सुनिल बाबुराव सावंत, वय–५१ वर्षे, अतिरिक्त सरकारी अभियोक्ता, वर्ग –१, अतिरीक्त सत्र न्यायालय, पालघर. |
| ५ | मागितलेल्या लाचेची रक्कम | १०,०००/– रूपये |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | ७,०००/– रूपये |
| ७ | थोडक्यात हकिगत | यातील तक्रारदार हे पालघर जिल्हा पोलीस आस्थापनेवर पोलीस नाईक या पदावर काम करतात. त्यांच्याविरुद्ध सन २०१५ मध्ये तारापूर पोलीस ठाणे, जि. पालघर येथे एक गुन्हा दाखल होता. माननीय अतिरिक्त सत्र न्यायालय, पालघर या न्यायालयात गुन्ह्याची सुनावणी होऊन जून २०२३ मध्ये माननीय न्यायालयाने तक्रारदार यांना निर्दोष मुक्त केले. त्यानंतर तक्रारदार यांनी पालघर जिल्हा पोलीस आस्थापनेकडे त्यांच्या पदोन्नती बाबत अर्ज केला. पोलीस अधीक्षक, पालघर, कार्यालयाकडून अतिरिक्त सरकारी अभियोक्ता, पालघर, यांच्याकडे पत्रव्यवहार करून तक्रारदार निर्दोष सुटलेल्या खटल्याबाबतचा सद्यस्थिती अहवाल मागविण्यात आला होता. तो अहवाल पोलीस अधीक्षक पालघर कार्यालयाकडे सादर करण्याकरता आरोपी लोकसेवक अतिरिक्त सरकारी अभियोक्ता हे तक्रारदार यांच्याकडे १०,०००/– लाचेची मांगणी करत असल्याबाबतची तक्रार प्राप्त झाली.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २५/१०/२०२३ रोजी पडताळणी केली असता नमुद आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे तडजोडी अंती ७०००/– रुपये लाचेची मांगणी केल्याचे निष्पन्न झाल्यावरून एसीबी पालघर युनिटने सापळयाचे आयोजन करून आरोपी लोकसेवक सुनिल बाबुराव सावंत यांना तक्रारदार यांच्याकडुन ७०००/– रूपयाची लाच स्विकारताना आज दिनांक २६/१०/२०२३ रोजी रंगेहाथ पकडण्यात आले असुन गुन्हयाचा पुढील तपास चालू आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर यांचेशी संपर्क करावा.

---

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर प. ४०१ ४०४.
संकेतस्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई–मेल :– dypacbpalghar@gmail.com
ऑनलाईन तक्रार :– ––
ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net
टोल फ्री नं. :– 1064
दुरध्वनी क्रमांक :– 02525-297297
व्हॉट्स ॲप क्र. :– 9423884745

(दयानंद गावडे)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पालघर